# मनाच्या तळाशी

गिरिजा कीर

रिया पब्लिकेशन्स्

**मनाच्या तळाशी : गिरिजा कीर**

**© गिरिजा कीर**

५, झपुर्झा, साहित्य सहवास,
वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१
संपर्क : २६५९०८८२

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रविंद्र सावंत
९६८९९०९८९८

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
मिरर प्रिटिंग प्रेस, कोल्हापूर.

**द्वितीय आवृत्ती**
मार्च, २०१२

**किंमत**
रुपये १८०/-

प्रिय शुभदास

(अहो) आईकडून
सप्रेम...

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| शाब्बास माज्या पोरी ! | ... | ७ |
| एक नवी पहाट | ... | १६ |
| नशिबाचं सहावं बोट | ... | ३० |
| फुलं फुलवणारा तातू | ... | ३८ |
| पाखरांना पंख फुटतात तेव्हा | ... | ५१ |
| आमचं रि-युनियन | ... | ६३ |
| एका चिमणीची गोष्ट | ... | ७२ |
| खालामाँ आणि पुजारीण | ... | ७९ |
| गजाआडचे नानाजी | ... | ८७ |
| माज्या मायची आण ! | ... | ९६ |
| मी प्रसरण पावते आहे | ... | १०४ |
| 'कजरा रे ऽऽ' | ... | ११३ |
| मुंबई कण्हते आहे | ... | १२२ |
| हाय क्या करू राम... | ... | १३० |
| कथा परिवर्तनाची | ... | १४० |
| तर अशी ही पन्नाशी | ... | १५० |
| तुमची शपथ ! | ... | १६१ |
| मनाच्या तळाशी | ... | १७६ |

# शाब्बास माझ्या पोरी !

एस. टी. थांबली. मी बॅग घेऊन उतरेतो धूळ उडवत ती नजरेआड गेलीसुद्धा. डोळे चोळत मी आसपासचा अंदाज घेतला. धुळीनं माखलेल्या दोन जुनाट पाट्या सवतीसारख्या एकमेकींकडे पहात, फाशी दिल्यागत तिठ्यावर लोंबकळत होत्या. एकीवर लिहिलं होतं, खुर्द आणि दुसरीवर बुद्रुक. आता आली पंचाईत. मला गावाचं नाव ठाऊक होतं. ज्यांच्याकडे जायचंय त्यांचं नाव माहीत होतं, पण त्यातले पोटभेद ठाऊक नव्हते. आता काय करावं कळेना.

समोरून एक छकडा (बैलगाडी) चालला होता. मी हात केला. छकडा थांबला. म्हटलं खेडं आहे. माणसं नावानं ओळखत असतील. विचारावं. 'अहो गाडीवाले, धनाजीराव पाटील कुठं राहतात म्हणायचे?'

'कंचं पाटील? खुर्दचं का बुद्रुकवालं? आता गेला बाजार दो अंगाला धा-धा पाटील हैत. आमी काय शेरातली मानसं नव्हं. कुनाकडं बी जावा, गूळ-पाणी देतीलाच बगा.'

गूळ-पाण्याचा प्रश्न मिटवून छकडेवाला त्याच्या वाटेला लागला. आता प्रश्न आणखीच बिकट झाला. या दहा-दहा म्हणजे एकूण वीस पाटलांपैकी कुणाकडे जायचं? मला एक वाईट खोड आहे. कुठला तरी किचकट विषय निवडायचा. त्याचा

पापुद्रा न् पापुद्रा सोलून काढायचा. त्याचं प्रोजेक्ट तयार करायचं. त्यातून मिळणाऱ्या विषयातून लेख किंवा कथा जन्माला घालायची. मुळात स्वत:ला असं गुंत्यात अडकवून घ्यायचंच कशाला? स्वत:ला कष्टवून मग वैतागायचं कशाला? याला उत्तर नाही. तो रक्तगुण आहे. त्यानुसार मी इथं येऊन ठेपले होते.

खेड्यापाड्यातलं स्त्री-जीवन, त्यांचे प्रश्न याची उत्तरं मला शोधायची होती. हाही माझ्या प्रोजेक्टमधला एक भाग होता. तसं मी सुलोचनाला कळवलं होतं. ती या वस्तीतली चार बुकं शिकलेली आणि पुरुषांच्या बरोबरीनं काम करणारी होती. तिच्याशी बोलून मला बरीच उपयुक्त माहिती मिळणार होती.

दुरवरून एक टुरिंग कार येताना दिसली. माझ्या बाजूलाच येऊन थांबली. 'तुम्ही समाजकार्य करणाऱ्या मुंबईवाल्या बाई का?' ड्रायव्हरनं मुंडकं बाहेर काढत विचारलं.

'होय.' मी पुढे होत म्हटलं.

'सुलोचनाबाई पाटलांनी धाडलं बघा गाडी घेऊन.'

मी आत चढले. तोंडावरची धूळ झटकली. टेंगूळ आलेल्या कुशनचा काथ्या आत ढकलत सारखी होत बसले. तेवढ्यात गाडीनं हनुमान उडी मारली. मी बॉबी जॉर्जच्या कौशल्यानं हाय-जंप घेऊन पुन्हा आसनस्थ झाले. खड्ड्यातून जाणारे रस्ते आणि ही कसरत मला नवीन नव्हती. पण इथं रस्ता नव्हताच, नुसते खड्डेच होते. ड्रायव्हरचं कसब पाहून वाटलं हा कुठल्याही मोटर-रेसमध्ये कुणालाही हार जायचा नाही. कशीबशी चावडीपर्यंत पोचले. जमिनीवर पाय टेकल्यावर लक्षात आलं, माझी सर्व हाडं आणि अवयव शाबूत आहेत.

सुलोचनाबाई समोर आली. सावळीच पण नीटस. करारी चेहरा. खेड्यात चारचौघांत काम करणारी बाई हिंमतवालीच हवी. कसा झाला प्रवास वगैरे नेहमीचे जुजबी प्रश्न. तिनं गाडी घराकडं घ्यायला सांगितली. वाटेत आम्ही दोघी बोलतच होतो.

चावडी म्हणजे गावाचं नाक. आलं-गेलं. अपघात-घोटाळे, भांडण-तंटे या सगळ्यांची नोंद तिथं व्हायची. गावच्या सरपंचाकडे रिपोर्ट द्यायला तिला जावं लागायचं. न्यायनिवाड्याच्या नोंदीही ठेवायला लागायच्या. शंभर कामं. अशा जोखमीच्या जागी गावानं, शिकलेली म्हणून सुलोचनाची निवड केली होती.



सुलोचनाच्या घराशी आम्ही उतरलो. कौलारू लहानसं घर, पुढं अंगण. मागं गोठा. गोठ्यात एक हडकी गाय. ग्रामपंचायतीनं मोफत वाटप केलं होतं म्हणे. 'गाय मोफत आली, पण तिला चारा कुठून द्यावा बाई ! इथं सहा-सहा महिने पाणी नाही. पगार तर तीन महिन्यांतून एकदा भेटतो. पोरांना दूध देताना मारामार. जनावरांना चारा कुठून आणायचा? प्रपंच कसा ओढायचा हीच काळजी.'

'यजमान काय करतात?'

'ते होय? खातात-पितात आणि चावडीवर येऊन तंबाखू मळत गावगप्पा करतात. रात्री मस्त झोपा काढतात. यांच्या लोकात पुरुषांना काम-धंदा करायची सवयच नाही. सगळं आयतं हवं. आता सांगा, अशानं कसं भागायचं?'

सुलोचनाचा संसार तसा नवाच होता. ती, सासू, नवरा आणि दोन वर्षांचा मुलगा. ही आख्खा दिवस कामावर. सासू घर सांभाळायची. नातवाकडं बघायची. वर काम मिळालं तर घरी आणून करायची. दोघी धाग्याला धागा जोडायच्या. संसाराचं वस्त्र फाटणार नाही याची काळजी घ्यायच्या.

संध्याकाळी नवरा आला. हात-पाय धुऊन मुलाशी खेळला. तोवर सासूनं भाकरीची परात ओढून थापायला सुरुवात केली. उनउनीत भाकरी वाढायला हवी ना! त्यानं विचारलंच, 'पाहुण्याबाईचं पान वाढायचं नाही का?'

'न्हाई. त्या म्हनल्या, आमच्या संगटंच बसते म्हून. तू जेव आपला.'

आईनं माहिती पुरवली. आई तोंड मिटून भाकऱ्या बडवत होती, सून मुकाट वाढत होती. धाकटं भाकरीचा तुकडा तोडत बापाशेजारी बसलं होतं. तो जेवून उठला आणि बाहेर अंगणात खाट टाकून बसला. आम्ही तिघी जेवायला बसलो. आता कुठं त्या दोघी जरा मोकळ्या ऐसपैस झाल्या. 'निचिंतीनं ज्येवा बरं का?' तिची सासू प्रेमानं म्हणाली -

'हे तुमचं सरकारी काम वाटतं?' सुलोचनानं शंका विचारली,

'नाही तर. सरकारचा संबंधच नाही. मी लेखिका आहे. काहीतरी डोक्यात घोळत असतं. मग त्या विषयाचा अभ्यास करते. त्यावर लिहिते. आताचा जो प्रोजेक्ट आहे, त्यात विविध थरातल्या स्त्रियांचा अभ्यास करायचा आहे. अगदी दारिद्र्यरेषेखालील स्त्रिया, परित्यक्ता यांच्यापासून तो थेट तुरुंगात जन्मठेप भोगणाऱ्या बायकांपर्यंत. किती वेगळ्या पद्धतीचं जगणं असतं ! दु:खच, पण प्रत्येक दु:खाची जात निराळी !'

'चांगलं काम करता. मग आम्हाला कुठल्या गटात घेतलंत? तुरुंगातल्या की-'

'भलतंच. खेडोपाड्यातल्या स्त्रीचं जगणं, तिचे प्रश्न-'

'मॅडम, मी चेष्टेत नाही बोलले. आम्ही पण तुरुंगातल्याच म्हणा की. त्या १४-१६-१८ वर्षांनी सुटणाऱ्या. आम्हाला जल्माचा कारावास. सुटका मरणानंच मिळायची.'

'हा मोकळा तुरुंग. घरात एक वनवास तर बाहेर दुसरा. फटके मारल्यागत शब्द, डसणारे डोळे. कुठं अन् कुणाला म्हणून तक्रार करायची? गिळायचं-जल्मभर दु:ख गिळायचं. उखळात तोंड घातलंय. आता वरनं घाव बसतोय म्हणून कुणाला सांगणार?'

'कुण्णाला बोलू नको माझ्या बाई, ज्येव. त्या परमेसराला इचार, म्हनावं, द्वाडा, मला बाईच्या जल्माला कश्यापायी रे घातलंस?' सासूनं भाकरीचा तुकडा मोडत विचारलं. मी ऐकत होते त्यांच्या दु:खाची कहाणी. एवढ्यात तिच्या नवऱ्याची चाहूल लागली. 'रात्रभर जेवतच बसताय का काय? पाव्हण्यांना विश्रांती घेऊ द्याल का नाही ?' त्यासरशी बोलणं थांबलं.

दोघी पटापटा घास घेत राहिल्या. पाच मिनिटांत आम्ही उठलोच पानावरनं.

दुसरे दिवशी सगळं आवरून सुलोचना कामावर गेली. नवरा न्याहारी घेऊन चावडीवर जायला निघाला. एका परीनं हे बरंच झालं. दुपार मोकळी मिळणार होती. तिच्या सासूशी निवांत बोलता येणार होतं.

'लई तरास काढते पोरगी. नवरा ह्यो आसा. ना काम, ना धंदा, चोवीस तास तंबाखू मळायचा. न्हाई म्हनायला एकराचं शेत हाय. वुलंवुलंसं येतं त्यातनं त्यावर काय भागतंया थोडंच?'

अंगणात पसरणी टाकून आवळ्याच्या झाडाखाली दोघी निवांत बसलो होतो. सासू मन मोकळं करत होती. ती मध्येच माझ्या बाजूला सरकली. कान गुजली, 'त्यो बाप्पा बी लई वंगाळ.'

'कोण म्हणता?'

'सरपंच, नजर घाणेरडी हाय बघा. पर नोकरी सोड तरी कशी म्हनू? तिच्या जिवावर घर चाललंय. तशी खमकी हाय, पर बाईमानूस. लई तरास हाय बघा डोक्याला. आता पुन्यानी दिस गेल्यात. परमेसरानं सांबाळावं.' मी नुसतीच हूं हूं करत होते. काय बोलणार? माझ्या शब्दानं तिचं दु:ख निवणार होतं थोडंच?



संध्याकाळचं केरवारं झालं. चहा झाला. सासवेची नजर सारखी दाराकडं अजून कशी नाही आली? एवढा उशीर होत नाही कधी हाच ध्यास.

सुलोचना दिवेलागण झाल्यावर घरी परतली. तिचे केस विसकटले होते. कपडे खराब झाले होते. डोळे मालवल्यागत दिसत होते. ती अंगातून मोडली होती जशी! दोघींनी धरून तिला आत आणली. ती उरी फुटून रडत होती. काय घडलं? कशानं काही कळत नव्हतं. अनुभवी सासू झटकन पुढं झाली. तिला गरम दूध दिलं. पंचानं पुसून काढलं. कसलं चाटण दिलं. तिला ग्लानी आली होती.

गावातल्या नर्सला बोलावणं गेलं. सासू पायाला-हाताला काही चोळत होती. मी तिच्याजवळ जाऊन बसले. हळू थोपटत राहिले. ती बारीक आवाजात रडतच होती. 'कसं झालं हे? काही जड उचललं का?' मी विचारलं. 'त्या भाड्यानं वेळ साधली. मी बेसावध होते हो. काय माहीत हा असा..... घरात कोण नव्हतं. मी खूप धडपड केली. बळ कमी पडलं. त्यानं..... आई गं ! काय करू? शी: ! मला माझीच किळस येते.'

'तू आधी गप्प बस सुलोचना. शांत हो बाई. जे घडलं त्याला इलाज नाही. अशा वेळी आपली शक्ती कमी पडते. धीर धर. आपण मार्ग काढू. आधी स्वत:कडे लक्ष दे. सांभाळ स्वत:ला.' मी काय सुचेल ते बोलत होते. खरं तर मला माझ्या दुबळेपणाची चीड येत होती. आमची सगळी शक्ती जिभेत. प्रत्यक्ष अशा प्रसंगी काय करायचं? कुणाची मदत घ्यायची? गावचा सरपंच. त्याच्याविरुद्ध कोण साक्ष देणार? मी आतून घाबरले होते. हे असं कधी पाहिलं नव्हतं. तेवढ्यात गावातली नर्स (कम् डॉक्टर) आली. आम्ही बाहेर आलो. जराशानं बाहेर येत ती खालच्या आवाजात बोलली, 'त्यांना जास्त धक्का बसलेला दिसतोय. घाबरलेल्या वाटतात. आता दोन दिवस झोपवूनच ठेवा. सध्या चौथा चालू असेल ना? तसं काही बिघडलं नाही. अंगावर गेल्यानं त्या जरा घाबरल्यात. समजुतीनं घ्या. काळजी करण्यासारखं काही नाही. कधी कधी असं होतं. पिंड घट्ट आहे. मी इंजेक्शन दिलंय. गोळ्या दिल्यात त्या चालू ठेवा. रव्याची लापशी, फळांचा रस देत जा. उपाशी ठेवू नका. पुढच्या आठवड्यापासनं कामाला गेल्या तरी चालतील. आणि..... भाऊंना म्हणावं, सध्या जरा दूरच ऱ्हावा. जपायला पाहिजे.'

सासवा-सुना मुकाट ऐकत होत्या. नर्स गेल्यावर ती खालच्या आवाजात मला म्हणाली, 'तुमच्या प्रॅक्टिकलमध्ये नसेल, पण थिअरीमध्ये स्त्रीची घरात होणारी घुसमट आणि बाहेरचा दबाव हे येतच असेल. संरक्षणाचा भागही असणारच.'

‘होय. सर्व विस्तारानं लिहिणार आहे. चीड यावी अशाच या गोष्टी आहेत. घृणास्पद.’

‘हे सगळं तुमच्या लेखनात येईल ना?’

‘नक्कीच.’

‘तुम्ही लिहिणार आहात. ते शिकले सवरलेले लोक वाचतील. इथंवर काय पोचणार? तुमचं कागदावरचं कागदावरच राहणार. आमचं जगणं-मरणं असंच चालू राहणार. आमचा प्रश्न कोण सोडवणार? ‘कुणी बाहेरून येऊन प्रश्न सोडवत नाहीत. आपणच कंबर कसून उभं राहायला हवं. आपला प्रश्न आपणच’ ‘मॅडम, हे खेडं आहे. आमचे बायकांचे भोग आम्हालाच ठाऊक. शहरात बरं असतं. मोर्चे, निषेध..... इथं काय? पूर्वी पाटील-तलाठी-जमीनदार हक्क गाजवायचे. मग शहरगावचे साहेब आले. आता आपलेच... यांना शिक्षा कुणी करायची? तक्रार करणाऱ्याचं तोंड बंद करतील हे धटिंगण. हे.... आई.... मला बोलवत नाही.’

‘तू झोप सुलोचना. माझ्या सगळं लक्षात आलंय. बोलण्यानं तुला अधिक त्रास होईल. मी उद्या जाईन म्हणते. जाऊ ना?’ तिनं मान हलवली. ‘गाडी सांगितलीय. स्टँडपर्यंत पोचवेल.’

तिला झापड आली. मी पाय न वाजवता हळू बाहेर आले. सासू भकास चेहऱ्यानं बसून होती. तेवढ्यात सुलोचनाचा नवरा आला. ‘काय झालं आई? बसूनशी?’

‘तिला बरं न्हाई.’

‘काय धाड भरली?’

‘आत्ता नर्सबाई येऊन दवा देऊन गेल्या. म्हनल्या जपायला हवं.’

‘जपायला? च्या मायला, कुटं कुस्ती मारायला गेलती का काय?’ तो बडबडत आत शिरला. त्याच्या आईनं थांबत थांबत सगळं सांगितलं. भाकर खाता खाता तो उसळून उठला. रागानं अंगणात फेऱ्या मारत राहिला. माझी अवस्था कानकोंड्यागत झाली. जेवावं-न जेवावं; बोलावं- न बोलावं सगळंच चमत्कारिक होऊन बसलं होतं. एवढ्या रात्री कुठं जाणंही शक्य नव्हतं. मुकाट दोन घास खाल्ले आणि बाजूच्या खोलीत पडून राहिले.



रात्री बराच वेळ घरात खडाजंगी चालली होती. नवऱ्याचा आवाज वरचा होता, उर्मटही. पण ती गप्प नव्हती. रडत-कण्हत का होईना प्रत्युतर देत होती. तिच्या स्वरात कमालीची चीड होती.

दुसरे दिवशी ती कामावर जाणं शक्यच नव्हतं. पडून होती. कण्हत होती. मी माझी बॅग भरली. अधिक बोलण्याची गरज नव्हती. या दोन दिवसांत भयानक सत्य उजेडात आलं होतं. मी तिच्या खाटेशी गेले. तिचे डोळे सुजमटले होते. चेहरा विसकटला होता. सासू काही औषधं देत तिच्या खाटेशीच खाली बसली होती. ‘येते मी. काळजी घे.’ मी निरोपाचं बोलले. ती फिकटसं हसली.

‘आता कामावर जाणं बंद करशील ना?’

‘काय म्हणून? मला जरा मोकळं होऊ द्या. बळ येऊ द्या. मिळेल तुमच्या प्रश्नाचं उत्तर.’ तिच्या डोळ्यांत सूड पेटला होता. तशा अवस्थेतही शब्दांना धार होती.

काय करेल ही? या गावात तिच्या पाठीशी कोण उभं राहील? पुन्हा जे घडलं त्याचा उच्चार करणं कठीण. लोक हिलाच दोषी ठरवतील. छी थू होईल. जगणं अवघड होऊन बसेल.

विचारातच मी मुंबई गाठली. पुढचे सहा महिने मी वृत्तपत्र चाळत होते. कुठे काही बातमी येते का पाहात होते. खरं म्हणजे मी भ्याडपणानं निघून आले होते. मी काही प्रोजेक्ट घेऊन जाते काय, एका घरी उतरते काय आणि त्या घरातली मालकीणच पुरुषाच्या भक्ष्यस्थानी पडते काय ! मी एक कथा लिहिली. आणखी काय करू शकणार होते? दु:खाला वाचा फोडली. स्त्रीची व्यथा जगापुढे मांडली.... भंपक ! शेवटी कागदी घोडे नाचवायचे. या अन्यायाला उत्तर?

आपण किती स्वत:त गुंतलोय? किती टणक कातडीचे झालोय? कशानंही हलत नाही. मी एक लेखिका. काय केलं मी? पळून आले. तिचा नवरा, सात फेरे घेऊन शपथेनं बांधलेला. शेवटी तिच्यावरच डाफरला. का नाही गेला त्या नराधमाचा घोट घ्यायला? ती बिचारी सासू-परिस्थितीनं गांजलेली.

आणि माझे वाचक? पत्रं आली, फोन आले आणि संपलं. वाफ निवली. नवा दिवस, नवे प्रश्न, नव्या घटना. त्यावर उपाय? कुणाला वेळ आहे?

माझ्या परीनं मी असहाय स्त्रियांना भेटून दिलासा द्यायला सुरवात केली. त्यांच्या तक्रारी वरपर्यंत पोचवू लागले. वकिलांची मदत घेऊ लागले. पोलिस अधिकाऱ्यांना भेटू लागले.

आता माझ्या तुरुंगाच्या फेऱ्या सुरू झाल्या. त्यांत धक्कादायक घटना कळू लागल्या. अगदी डॉक्टर वकिलांपासून ते झाडूवाल्या बाईपर्यंतच्या गुन्हेगार. आश्चर्य म्हणजे त्या आवर्जून मला भेटायच्या. सत्य सांगायच्या. त्यांना कुठंतरी दुःख हलकं झाल्याचं समाधान मिळायचं.

आणि एका जेलमधे मला समुपदेशनाला बोलावलं. '८ मार्च–महिला मुक्तिदिन. क्रांतिकारी दिन. मी बोलत होते. नजर श्रोत्यांवरून फिरत होती. त्यांच्या मनापर्यंत पोचू पाहात होती आणि मी एकदम थांबले. मला भास तर नाही होत?'

हा चेहरा माझ्या खूप खूप ओळखीचा आहे. कोण?..... ही, ही सुलोचना तर नव्हे? ती इथं कशी आली? काय घडलं? ही जन्मठेपेची कैदी?

मी कमालीची अस्वस्थ झाले. तिनं माझी नजर झेलली. तिच्या चेहऱ्यावर ओळखीचं हसू पसरलं. भाषण संपलं. मी पोलीस अधिकाऱ्यांना विचारलं, 'ही कोण?'

'ही सुलोचना धांडे. गावच्या सरपंचाचा खून केलाय तिनं. महाझांबरी आहे. चेहरा बघा कसा धट्ट. काही भीती, पश्चात्ताप आहे का? मोठ्या निगरगट्ट असतात हो या बायका.'

'मी बोलू तिच्याशी?'

'अरे, बाईंना घेऊन जा तिच्याकडं.' अधिकाऱ्यांनी हुकूम सोडला.

ती थांबलीच होती. मला बघून पुढे झाली. पायावर डोकं ठेवलं. मी तिचे हात हातात घेतले. ते रापट वाटले. चेहराही निबरट दिसत होता. ती हसून म्हणाली, 'मी तुमची वाट बघत होते. मला माहीत होतं, आज ना उद्या तुम्ही भेटणार. मी माझा शब्द खरा केला.'

'म्हणजे तू'

'होय. संपवला त्याला. त्याच्या घरात. त्याच्या खोलीत. तयारीनंच गेले होते. या वेळी तो बेसावध होता. जगातलं एक पाप संपवलं.'

'पण तुझ्या आयुष्याचं काय?'

'जे केलंय त्याची शिक्षा भोगतेय ना ! माझ्यासारख्या आणि किती जणी इथं असतील. न्यायानं त्या गुन्हेगारच खुनी.'

'पण बाई, शरम वाटावी असं मी काही केलं नाही. तुम्हीच सांगितलं होतंत, तुमचे प्रश्न तुम्हीच सोडवायला हवेत. मी माझा प्रश्न सोडवला. अनेक दुबळ्या मुलींचा प्रश्न सोडवला. त्याच्या पतिव्रता बायकोची वाट मोकळी केली. मला खात्री



आहे. मनातल्या मनात तिनं माझे आभारच मानले असतील. निदान या पुढे त्या खोलीत बलात्कार होणार नाहीत. बायकांचे दबलेले हुंदके ऐकू येणार नाहीत.'

'आता मीच तुम्हाला सांगते, लिहा माझ्यावर कळू दे जगाला ही सत्य घटना.'

'तुझी सासू काय म्हणाली?'

'साक्ष ऐकायला येत होती. शिक्षा ऐकून गळ्यात पडून रडली. पण म्हणाली, – शाब्बास माज्या पोरी ! बाईच्या जातीची लाज राखलीस.'

त्या क्षणी वाटलं, तिच्या पायावर डोकं ठेवावं, आणि तिच्या म्हाताऱ्या बहादूर सासूच्या गळ्यात पडून पोटभर रडून घ्यावं.

✦✦

# एक नवी पहाट

विमानतळावरून विमानानं उड्डाण केलं आणि मी डोळे भरून मुंबई पाहून घेतली. कदाचित ही माझी अखेरची भेट असेल.....

डॅडी गेले आणि स्वत:बरोबर खूप काही घेऊन गेले. त्यांचं मायेचं छत्र, आधार सगळंच ते या जगात नाहीत हे कठोर सत्य मी स्वीकारूच शकत नाही. ते माझ्या आयुष्यात आले नसते तर आज जी जेनिफर आहे ती अशीच एक कुणी बेवारशी, अनाथ मुलगी राहिली असती. माणूस प्रेम देऊ शकतो म्हणजे किती हे डॅडींमुळं मला कळू शकलं. मी कुठची कोण? कुणाची कोण? जात-धर्म-पंथ-वर्ण कुठेच काही संबंध नाही. पण त्यांनी दाखवून दिलं या सर्वांपेक्षा प्रेम देण्याची शक्ती मोठी आहे.

आणि आज मी चालले आहे, त्यांच्या रक्षेचा चांदीचा करंडक आणि त्यांनी रुमालात बांधलेली पत्रं घेऊन. या पत्रांतून माझा पूर्ण जीवनपट उलगडतो. किती जपून ठेवलीय ही इस्टेट त्यांनी.

डॅडी थकले होते. आज ना उद्या जाणारच होते. पण कुणाला कल्पनाही न देता असे झोपेत निघून जातील असं वाटलं नव्हतं. त्यांना अखेरचं काही बोलायचं



असेल का? नाहीतर मला एवढ्या तातडीनं बोलावून घेतलं नसतं. दुर्दैवी मी ! अखेरचं बोलूही शकले नाही.

त्यांचा लाडका नातू त्यांच्या गळ्यात हात टाकून झोपला होता. त्यांच्या हडकुळ्या वृद्ध शरीराची ऊब त्याला पुरेशी वाटत होती. आणि केव्हातरी हात विलग झाले. ऊब थांबली. चैतन्य निमालं. ऋषीनं जोरात हाक मारली... 'मम्मी'... 'मम्मा'... आम्ही दोघी धावलो.

डॅडी शांत झोपले तर होते. अखेरची शांत झोप. कसलं किल्मिष नाही, यातना, त्रास, त्रागा काही नाही. इथून उठून दुसऱ्या जगात गेले होते.

त्यांच्या जाण्यानं मी आयुष्यातलं खूप काही गमावून बसले. ममांना खूप सांगितलं, 'चला, पण त्यांचं एकच उत्तर, 'ते जिथं राहिले, वावरले ती पुण्यभूमी सोडून मी कुठेच येणार नाही. इथल्या प्रत्येक वस्तूत ते आहेत. आम्ही साठ वर्षं एकमेकांच्या सोबतीनं काढली. आता मी कुठेच जाणार नाही.' केवढी निष्ठा ! केवढं प्रेम ! हे भारतीय स्त्रीच करू शकते. त्या पावन भूमीला माझा प्रणाम !

✦

घरी आले. दोन दिवसांनी बॅग उघडली? पत्रांची चळत. सुरवातीची पत्रं अशीच. ती बाजूला टाकली. एका पत्रानं माझं लक्ष वेधलं.

तिथूनच माझ्या आयुष्यानं वेगळं वळण घेतलं होतं. त्यात मी माझ्याबद्दल (पूर्वेतिहासाबद्दल) लिहिलं होतं. मला ठाऊक होतं, अनिकेतनं भीतीपोटी असेल, माझी त्यांना नीट ओळख करून दिली नसेल. डॅडींसारख्या स्वच्छ मनाच्या पित्याला त्यानं सगळं स्पष्ट सांगायला हवं होतं. सांगितलं असेल किंवा नसेल. मी जी आणि जशी आहे तशीच त्यांच्यापुढे उभी राहिले.....

मी एकेक पत्र वाचू लागले-

प्रिय डॅडी,

आज कितीतरी दिवसांनी हे पत्र लिहिते आहे. आठवण होत नव्हती किंवा खूप कामात होते असं खोटं कसं लिहू? नोकरी, घरकाम हे तर रोजचंच. त्यातून वेळ मिळेल तेव्हा लिहावं तर..... लिहिण्यासारखं खूप आहे आणि ते फक्त मी तुम्हालाच लिहू शकते. पण लिहावं असं चांगलं काही घडतंच नाहीय. त्यातून मी जे लिहिणार आहे ते वाचून तुम्हाला दु:ख होईल.

तुमच्यासारख्या सज्जन, सत्प्रवृत्त माणसाला दु:ख देणं हे पाप आहे, हे मलाही कळतं. पण तुम्हीच सांगा डॅडी, माझं दु:ख मी कुणाला सांगू? आई-बापापासून दूर फेकली गेलेली मी दुर्दैवी मुलगी. दुसऱ्या महायुद्धाची ही मोठी देन आहे. सैन्य आलं की दहा दिशांना धावणारी वडीलधारी माणसं आणि आईच्या कुशीत तोंड दाबून पडलेली मुलं. सैनिकांना बाई हवी असायची. मूल फेकलं जायचं आणि तरुण स्त्री ओढून नेली जायची.

माझ्या आईचं काय झालं असेल? गॉड नोज ! दुर्दैवी मी तशाही स्थितीत बचावले. कुणा बापड्याला माझी दया आली. मला हृदयाशी घट्ट धरून तो धावत होता. लपतछपत, अंधार कापत, रस्ता फुटेल तिकडे धावत होता. पाय रक्ताळले होते. तो जोरजोरात श्वास टाकत होता. आणि मी? मी वाचा हरवल्यासारखी त्याच्या मिठीत गुपचूप पडून होते. एका तळघरात मला एका स्त्रीच्या आधीन करून तो भुईला टेकला. पुढं त्याचं काय झालं असेल?

त्या बाईनं मला मोठ्या हिमतीनं वाचवलं. रेडक्रॉसच्या गाडीतून सैनिकांच्या छावणीत मला पोचवलं. तिच्या दृष्टीनं मित्रपक्षाच्या.

कोण होते मी? इंग्लिश? फ्रेंच? जर्मन? रशियन? मला ठाऊक नाही. मी माणूस होते आणि कुणा करुणार्द्र पुरुषानं आणि स्त्रीनं मला वाचवलं. कोण होते मी त्यांची? फक्त एकच जात मानणारे ते लोक होते - माणुसकी ! सत्ता - पिपासा, सार्वभौमत्व, हेवा-दावा-द्वेष यापासून योजने दूर राहून माणुसकी जगवणारे आणि जागवणारे लोक होते. त्यांनी मला वाचवलं. वाढवलं. शिकवलं. मोठं केलं आणि अनाथाश्रमातून जगाच्या मोठ्या दरवाजाशी आणून सोडलं.

'नो मोअर हिरोशिमांची फलकं हातात घेऊन आम्ही शाळेतल्या मुली रस्तोरस्ती हिंडलो होतो. सैनिकांच्या विधवांसाठी पेट्या फिरवल्या, फंड जमवले. या सगळ्याचा अर्थ मला पुरेसा कळत नव्हता, पण माझ्या अनाथपणानं मला बरंचसं शहाणं केलं.

मी मोठी झाले. नोकरी करायला लागले. युद्धपिपासू लोकांपासून दूर राहून जगाच्या शांततेसाठी, मी न पाहिलेल्या आई-बाबांसाठी प्रार्थना करू लागले आणि एका प्रार्थना मंदिरात अनिकेतचा आणि माझा परिचय झाला.



पुढचं तुम्हाला सांगायला नको. फिल् इन् द ब्लँक्स.

भारतात प्रथम आले तेव्हा खूप घाबरले होते. इथली माणसं कशी असतील, कशी वागतील, आपल्याला कशी रिसीव्ह करतील? अनेक प्रश्न. आणि डॅडी, पहिल्याच भेटीत तुम्ही म्हणालात, 'Excellent Choice. आता माझ्या मुलाला तू सांभाळायचंस.'

आणि मी सांभाळत गेले. पहिली पाच वर्षं कशी मजेत गेली आणि अनिकेतच्या लक्षात आलं. माझ्या पगारात दोघांचं व्यवस्थित भागू शकतं. मग तो त्याचे पैसे स्वत:वरच खर्च करू लागला. दारू सुरवातीला आवड होती, पुढे ती चैन झाली. मग तर व्यसन. दारूखेरीज त्याचं भागेनासं झालं. पुढे पुढे तर तो पाण्याऐवजी दारूच घ्यायला लागला. एक दिवस त्याच्या वरिष्ठांनी बोलावून त्याला समज दिली. त्यानं ते फारसं मनावर घेतलं नाही. पुढच्याच महिन्यात त्याची हकालपट्टी झाली.

गेले वर्षभर तो बेकार आहे. माझ्याकडेच दारूसाठी पैसे मागतो. त्याचं व्यसन, अव्यवस्थित वागणं, दारूसाठी जबरदस्तीनं पैसे घेणं, आरडाओरडा करणं या सगळ्याचा छोट्या ऋषीवर फार वाईट परिणाम होऊ लागला. आता मला निर्णय घेणं भागच आहे. अनिकेत आणि ऋषी एकत्र राहता कामा नये. एक तर ऋषीला होस्टेलमध्ये ठेवायला हवं किंवा मी आणि ऋषीनं वेगळं राहायला हवं. मी काय करू? अनिकेतला अशा स्थितीत एकटं ठेवणंही धोक्याचं. दोन्हीकडून माझी मुस्कटदाबी. मी कोणताही कठोर निर्णय घ्यायला तयार आहे. मी स्वत:चा विचार बाजूला ठेवला आहे. ऋषीच्या भवितव्याचा विचार करून सांगा, मी काय करू?

डॅडी, नात्यानं तुम्ही सासरे असलात तरी मी तुम्हाला वडिलांच्या जागी मानते. तुमच्या या दुर्दैवी मुलीला सांगा, तिनं काय करावं? मम्मांना पत्र दाखवू नका, त्यांना फार मनस्ताप होईल.

आपली मुलगी

जेनी

✦